**<u>प्रेसनोट</u> दिनांक १३/०७/२०१९**

**बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**दिड लाखाची चोरीकरणाऱ्या सिक्युरीटी गार्डला बंडगार्डन पोलीसांनी ०४ तासांच्या आत केले जेरबंद**

---

बंडगार्डन पोलीस स्टेशनच्या हद्दीतील आयनॉक्स मल्टिप्लेक्समध्ये सिक्युरीटीचे काम करणाऱ्या युवकाने मल्टीप्लेक्स मधील कॅशीअरच्या रुममधील तिजोरीतून दिड लाख रुपयांवर हात मारुन फरार झालेल्यास बंडगार्डन पोलीसांनी ०४ तासांच्या आत ठोकल्या बेड्या.

दि.१२/०७/२०१९ रोजी आयनॉक्स थिएटरच्या दुसऱ्या मजल्यावरील कॅशकाऊंटर रुममधील तिजोरीत ठेवलेली १,५६,०००/- रु. रोख रक्कम,कॅशीअरची नजर चुकवून सदर थिएटरमध्ये सिक्युरीटीचे काम करणारा आतिश उद्धव कांबळे, वय-२४ वर्षे, रा. बी.जी.शिर्के कंपनीजवळ, भिम नगर झोपडपट्टी, मुंढवा, पुणे याने चोरुन, शर्टच्या आत टाकुन, आयनॉक्स थिएटरमधून निघून गेला. सदरचा सर्व प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यातकैद झाल्यानंतर सदरथिएटरचे मॅनेजर अंकुर ललीत कटपाल, रा. पिसोळी, पुणे यांनी सदरची बाब लागलीच बंडगार्डन पोलीस स्टेशनला कळविली असता बंडगार्डन पोलीस स्टेशनमध्ये सिक्युरीटीचे कामकरणाऱ्या आतिश कांबळे याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्ह्याचा तपास मा. पोलीस उप-आयुक्त श्री. बच्चन सिंह, मा. सहा. पोलीस आयुक्तडॉ.प्रिती टिपरे यांचे मार्गदर्शनाखाली व बंडगार्डन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल तांबे यांचे सुचनांप्रमाणे सुरु केला. गुन्ह्याचा तपास करीत असताना गुन्ह्यातील आरोपी त्याचे घरी सायंकाळच्या वेळी येणार असल्याची माहिती तपास पथकाला मिळाल्याने तपास पथकाच्या पोलीसांनी त्याचे घराचे आजूबाजूला सापळा रचला असता आरोपी बी.जी.शिर्के कंपनीच्या जवळ आला असताना पोलीसांनी त्यास शिताफीने पकडून त्याचेकडून गुन्ह्यातील १,५१,०००/- जप्त केले असून त्यास अटक केली आहे.

सदरची चांगली कामगिरी परिमंडळ-२ चे पोलीस उपायुक्त श्री. बच्चन सिंह, लष्कर विभागाचे सहा.पोलीस आयुक्त डॉ. प्रिती टिपरे, बंडगार्डन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल तांबे, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री. दिगंबर शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक श्री. संदिप जमदाडे, फिरोज शेख, नवनाथ रावडांगे, संतोष पागार, हरीष मोरे, अय्याज दड्डीकर, कैलास डुकरे, श्रीधर सानप, निखील जाधव यांनी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर